प्रथम वर्ष वाणिज्य • सत्र- १

**CBCS PATTERN**

# व्यावसायिक

# अर्थशास्त्र (भाग- १)

## BUSINESS ECONOMICS

डॉ. एन. एल. चव्हाण




Prashant

**महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गातील 'अर्थशास्त्र' विषयासाठी उपयुक्त.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ – अर्थशास्त्र विषयाच्या एफ.वाय.बी.कॉम. च्या
नविन CBCS अभ्यासक्रमानुसार क्रमिक पुस्तक.

**MPSC, UPSC, NET-SET व इतर स्पर्धा परीक्षांसाठीही उपयुक्त.**

**(भाग–१)**

# व्यावसायिक अर्थशास्त्र

## BUSINESS ECONOMICS (PART - I)


**प्राध्यापक (डॉ.) एन. एल. चव्हाण**
प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगाव.



Prashant

**प्रशांत पब्लिकेशन्स**

**व्यावसायिक अर्थशास्त्र (भाग–1)**

Business Economics (Part - I)

© सुरक्षित

**प्रकाशक । मुद्रक**

रंगराव पाटील

प्रशांत पब्लिकेशन्स

3, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,

नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,

जळगाव 425001.

**दूरध्वनी । वेब । ईमेल**

0257–2235520,2232800

www.prashantpublications.com

prashantpublication.jal@gmail.com

**आवृत्ती । आयएसबीएन । किंमत**

जुलै 2019

978–81–939897–8–4

₹ 225/-

**अक्षरजुळवणी**

प्रशांत पब्लिकेशन्स

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

माझी कन्या सौ. मीनल कुणाल बडगुजर (पुणे) हिस
28 जुलैच्या वाढदिवसाप्रित्यर्थ सस्नेह भेट.

**प्रोफेसर डॉ. एन. एल. चव्हाण**

एम.ए. (अर्थशास्त्र), एम.फिल., पीएच.डी.

- प्रोफेसर आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि.जळगाव.
- संयोजक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - अभ्यास केंद्र धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर जि.जळगाव.
- मार्च २०१९ पासून प्रोफेसर पदावर पदोन्नती.
- एम.फिल, पीएच.डी. मार्गदर्शक (क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव)
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचा उत्कृष्ठ केंद्र संयोजक पुरस्कार (जून २०१७)
- सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र या पुस्तकास मराठी अर्थशास्त्र परिषदेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद हा उत्कृष्ठ ग्रंथ पुरस्कार प्राप्त (नोव्हेंबर २०१७)
- बी.ओ.एस., बी.ओ.ई. आणि फॅकल्टी मेंबर, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

» बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या पदवी व पदव्युत्तर वर्गांना शिकविण्याचा दीर्घ अनुभव तसेच एम.फिल. पदव्युत्तर वर्गास शिकविण्याचा अनुभव.

» 'भारतीय थेट विदेशी गुंतवणूकीची प्रवृत्ती आणि परिणामांचे विश्लेषणात्मक अध्ययन' या विषयावर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावमधून पीएच.डी. पदवी संपादन.

» यु.जी.सी. मान्यताप्राप्त एक मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण.

» लोकमत, सकाळ, तरुण भारत वृत्तपत्रात अर्थशास्त्रीय लेख प्रसिद्ध.

» अर्थसंवाद, अर्थमंथन, अर्थवेध या त्रैमासिक व साप्ताहिकात लेख प्रसिद्ध.

» राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये २५ शोधनिबंध प्रकाशित.

» विविध महाविद्यालयात अर्थशास्त्रीय व्याख्याने, चर्चासत्र अध्यक्ष आणि चर्चासत्रांमध्ये सहभाग.

» उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अर्थशास्त्र व वाणिज्य अर्थशास्त्र अभ्यासक्रम पुनर्रचनेत सहभाग.

# मनोगत

दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) संपूर्ण भारतासाठी एकच युनिव्हर्सल Choice Base Credit System (CBCS) हा पॅटर्न राबवायला सुरूवात केली आहे. या मागील उद्देश विद्यार्थ्यांना विषय निवडीबाबत वाव निर्माण व्हावा आणि कोणत्याही विद्यार्थ्याला, कोणत्याही वर्षी, कोणत्याही विद्यापीठात सहज प्रवेश मिळविता यावा असा आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे 2019-20 पासून CBCS पॅटर्न स्वीकारला. त्यानुसार वाणिज्य विद्याशाखेने सर्व विषयांच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना केली आहे. वाणिज्य विद्याशाखेत अर्थशास्त्र हा विषय सक्तीचा आहे कारण वाणिज्य विद्याशाखेचा आधार अर्थशास्त्र आहे. विद्याशाखेने प्रथम वर्ष बी.कॉम.साठी व्यावसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म अर्थशास्त्र) हा विषय सादर केला आहे.

व्यावसायिक अर्थशास्त्रातील महत्वाच्या संकल्पना आणि सिद्धान्त उपभोक्ते आणि व्यावसायिकांना व्यावसायिक निर्णय घेण्यास मदत करीत असतात. यात प्रामुख्याने उपभोक्त्याच्या वर्तणुकीचे सिद्धान्त, उत्पादकाच्या वर्तणुकीचे सिद्धान्त, विभाजनाचे सिद्धान्त यांचा अभ्यास केला जातो. त्या पैकी एफ.वाय.बी.कॉम या वर्गाच्या पहिल्या सत्राच्या अभ्यासक्रमात व्यावसायिक अर्थशास्त्राचा परिचय, मूलभूत संकल्पन, उपयोगितेचे संख्यावाचक व क्रमवाचक विश्लेषण, मागणी-पुरवठा विश्लेषण, पुरवठा विश्लेषण या प्रमुख मुद्यांचा समावेश केलेला आहे.

प्रस्तुत क्रमिक पुस्तकात अभ्यासक्रमात समाविष्ट सर्व मुख्य आणि उपमुद्यांची विस्तृत, सखोल आणि मुद्देसुद मांडणी केलेली आहे. विद्यार्थ्यांची बौद्धीक क्षमता आणि पातळी विचारात घेवून विषय अत्यंत सोप्या मातृभाषेत मांडला आहे. सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र हा एक सैद्धान्तिक विषय आहे. तो समजण्यास सोपा जावा म्हणून आकृत्यांचा वापर केलेला आहे. आकृत्यांचे स्पष्टीकरण सहज समजेल असे सोपे केलेले आहे. सदर पुस्तक लिखाणासाठी विद्यापीठाने सूचित केलेल्या संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे. सर्व प्रथम मी संदर्भ ग्रंथ कर्त्यांचे विशेष आभार मानतो.

प्रस्तुत पुस्तक आपल्या हाती देण्याचे सर्व श्रेय माझे स्नेही मा. रंगरावजी पाटील, श्री. प्रदीप पाटील, मार्केटींग व्यवस्थापन करणारे श्री. दीपक पाटील आणि प्रशांत पब्लिकेशन्सचे सर्व कर्मचारी या सर्वांनी पुस्तक आपल्यापर्यंत पोहोचवण्यात मोलाचे योगदान दिले आहे म्हणून मी या सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

प्रस्तुत पुस्तक मी जास्तीत जास्त परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही त्यात काही उणिवा राहिल्या असतील तर त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे. माझ्या आजपर्यंतच्या 28 क्रमिक व संदर्भ पुस्तकांना अभ्यासक वर्गाने व विद्यार्थी वर्गाने प्रचंड प्रतिसाद दिला आहे. या पुस्तकासाठी तसाच प्रतिसाद राहील याची मला खात्री आहे.

**– प्रा.डॉ. एन. एल. चव्हाण**
**फैजपूर, जि. जळगाव**
**9420347087**

## अनुक्रमणिका

**1. व्यावसायिक अर्थशास्त्राचा परिचय आणि मूलभूत संकल्पना ......9**
(Introduction to Business Economics and Basic Concepts)
1.1 व्यावसायिक अर्थशास्त्र
(Business Economics)
1.2 सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्र आणि समग्रलक्षी अर्थशास्त्र
(Micro Economics and Macro Economics)
1.3 आर्थिक विश्लेषणाची साधने
(Tools of Economic Analysis)
1.4 काही मूलभूत संकल्पना
(Some Basic Concept)
1.5 प्रत्यक्ष व्यवहारातील उद्योगसंस्था
(Firms in Reality)
1.6 उद्योगसंस्थेचे उद्दिष्ट्ये
(Goals/Objectives of Firm)

**2. उपभोक्त्याच्या वर्तणूकीचे सिद्धांत .............................. 52**
(The Theory of Consumer Behaviour)
2.1 संख्यावाचक उपयोगिता दृष्टीकोन
(Cardinal Utility Approach)
2.2 घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम
(The Law of Diminishing Manginal Utility)
2.3 क्रमवाचक उपयोगिता दृष्टीकोन/समवृत्ती वक्र विश्लेषण
(Ordinal Utility Apporach / Indifference Curve Analysis)
2.4 उपभोक्त्याचे संतोषाधिक्य/बचत संकल्पना
(Concept of Consumer Surplus)

**3. मागणी–पुरवठा विश्लेषण ...................................... 98**

(Demand and Supply Analysis)

3.1 मागणीचा अर्थ

(Meaning of Demand)

3.2 मागणीचे फलन किंवा मागणीचे निर्धारक घटक

(Demand function or Determinants of Demand)

3.3 मागणीचा नियम

(The Law of Demand)

3.4 मागणीची लवचिकता

(Elasticity of Demand)

3.5 किंमत निश्चिती सिध्दान्त आणि
मागणी–पुरवठा विश्लेषणाचा व्यावहारिक उपयोग

(Theory of Price Determination and
Applications of Demand and Supply Analysis)

**4. उत्पादन विश्लेषण ............................................. 147**

(Production Analysis)

4.1 उत्पादन फलन

(Production Function)

4.2 एकूण, सरासरी आणि सीमांत उत्पादन

(Total Avarage and Marginal Product)

4.3 बदलत्या प्रमाणाचा नियम

(The law of Variable Proportions)

4.4 उत्पादन प्रमाणाच्या मितव्ययता/बचती आणि अमितव्ययता/अबचती

(Economies and Diseconomies of Scale of Production)

प्रकरण 1

# व्यावसायिक अर्थशास्त्राचा परिचय आणि मूलभूत संकल्पना

## Introduction to Business Economics and Basic Concepts

*१.१ व्यावसायिक अर्थशास्त्र*
*१.२ सुक्ष्मलक्षी अर्थशास्त्र आणि समग्रलक्षी अर्थशास्त्र*
*१.३ आर्थिक विश्लेषणाची साधने*
*१.४ काही मूलभूत संकल्पना*
*१.५ प्रत्यक्ष व्यवहारातील उद्योगसंस्था*
*१.६ उद्योगसंस्थेचे उद्दिष्ट्ये*

व्यावसायिक अर्थशास्त्र (Business Economics) हा सैध्दान्तिक अर्थशास्त्र (Theoretical Economics) या विशाल अभ्यास विषयाचा उद्योग संस्था, व्यवसाय संस्थांच्या व्यावसायिक आणि व्यावहारीक निर्णयासंबधी असलेला एक व्यावहारीक (Applied) भाग आहे. व्यावसायिक अर्थशास्त्र हे वाणिज्य विद्या शाखेचे (Comerce Faculty) अविभाज्य अंग आहे. वाणिज्य विद्या शाखेतील बहुतांश मुलभूत संकल्पना (Basic Concepts) व्यावहारीक रूपाने अर्थशास्त्राकडूनच आलेल्या आहेत. या शाखेचा मूळ पायाच अर्थशास्त्र आहे. प्रा.रॉबिन्स यांनी म्हटले आहे की, मानवी गरजा अमर्याद असतात परंतु त्या भागविण्यासाठी उपलब्ध असलेली साधने मर्यादित, दुर्मिळ असतात, पण त्यांचा पर्यायी वापर शक्य असतो. यामुळेच मानवा समोर उत्पादन, विभाजन, विनिमय आणि उपभोग विषयक अनेक आर्थिक प्रश्न निर्माण होतात. आर्थिक प्रश्नांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो. आर्थिक प्रश्न का निर्माण होतात, त्यांची सोडवणूक कशी करायची, आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कोणत्या यंत्रणेचा वापर करायचा, उद्योग संस्थेने नफ्याचे महत्तमीकरण कसे करायचे, उपभोक्त्यांनी समाधानाचे आणि सामाजिक कल्याणाचे महत्तमीकरण कसे करायचे याबाबत अर्थशास्त्र आणि अर्थशास्त्रज्ञ व्यक्ती, उद्योग संस्था, सरकार यांना सिध्दान्त, नियम, प्रतिमान रूपाने मार्गदर्शन करतात. अर्थशास्त्र हा अभ्यास विषय सुक्ष्म लक्षी अर्थशास्त्र (Micro Economics) आणि समग्र लक्षी अर्थशास्त्र (Macro Economics) अशा दोन भागात विभागला

आहे. सुक्ष्म लक्षी आणि समग्र लक्षी अर्थशास्त्रीय सिध्दान्तांचा उद्योग संस्थेचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी व्यवहार्य निर्णय घेणे आणि भविष्यकालीन नियोजन आखण्यासाठी व्यावहारीक वापर कसा करून घ्यायचा याबाबत मार्गदर्शन करण्याचे कार्य व्यावसायिक अर्थशास्त्र करते.

## 1.1 व्यावसायिक अर्थशास्त्र (Business Economics)

### अ) व्यावसायिक अर्थशास्त्र म्हणजे काय?

(What is Business Economics?)

प्रा. जोएल डीन यांचा 'Managerial Economics' हा ग्रंथ 1951 मध्ये प्रकाशित झाला आणि या ग्रंथाने 'Business Economics' (व्यावसायिक अर्थशास्त्र) ही अर्थशास्त्राची नवीन अभ्यासशाखा जन्माला घातली. अर्थशास्त्राला व्यावहारीकतेचे रुप प्रदान करणारी ही महत्वपूर्ण शाखा आहे. व्यावसायिक अर्थशास्त्र उद्योग संस्थेच्या व्यवस्थापकाला आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व व्यावसायिक निर्णय घेण्यास मदत करणारी शाखा असल्याने तिला व्यवस्थापकीय अर्थशास्त्र (Managerial Economis) असेही म्हणतात. तसेच ही शाखा उद्योग संस्थेच्या व्यावहारीक वर्तणुकीचे विश्लेषण करते म्हणून तिला 'उद्योग संस्थेचे अर्थशास्त्र' (Economics of firm) म्हणूनही ओळखले जाते. व्यावसायिक अर्थशास्त्र जरी वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी त्या सर्वांचा अर्थ एकच आहे.

व्यावसायिक अर्थशास्त्र म्हणजे काय ? हे समजून घेण्यासाठी व्यावसायिक अर्थशास्त्राच्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक ठरेल. व्यावसायिक अर्थशास्त्राच्या ज्या विविध व्याख्या करण्यात आल्या आहेत त्यात प्रामुख्याने व्यवस्थापकीय अर्थशास्त्र (Managerial Economics) हाच शब्द प्रयोग करण्यात आला आहे.

व्यावसायिक अर्थशास्त्राच्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

» **मॅकनायर आणि मेरियम** यांच्या मते – ''व्यावसायिक परिस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी आर्थिक विचार पध्दतींचा वापर करणारे शास्त्र म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय.''

» **स्पेन्सर आणि लुईस सिगलमन** यांच्या मते – ''व्यवस्थापन मंडळाला व्यावसायिक निर्णय घेणे आणि भविष्यकालीन नियोजन तयार करणे सोईचे व्हावे म्हणून व्यावसायिक व्यवहार आणि आर्थिक सिध्दान्ताचे एकीकरण म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय.''

» **ब्रिगहम आणि पपास्** यांच्या मते – ''व्यावसायिक प्रशासन व्यवहारासाठी आर्थिक सिध्दान्त आणि कार्य पध्दतीचा व्यवहारात वापर करणे म्हणजे व्यावसायिक अर्थशास्त्र होय.''

» **जोएल डीन** यांच्या मतानुसार - ''आर्थिक विश्लेषणाचा उपयोग व्यावसायिक धोरण निश्चितीत कशा तऱ्हेने केला जाऊ शकतो हे दर्शविण्याचा ज्याचा हेतू असतो त्याला व्यावसायिक अर्थशास्त्र असे म्हणतात.''

वरील निवडक व्याख्यांमधून व्यावसायिक अर्थशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि मर्यादा स्पष्ट होतात.

व्यावसायिक अर्थशास्त्र अर्थशास्त्रीय सिध्दान्तांना व्यावहारीकतेचे रूप प्रदान करणारे शास्त्र आहे. हे शास्त्र सिध्दान्त आणि त्यांचा व्यवहारातील वापर यातील अंतर कमी करून अर्थशास्त्राची उपयुक्तता वाढविणारे आहे. जेव्हा एखादी उद्योग संस्था नफ्याच्या अपेक्षेने उत्पादनात प्रवेश करण्याचा निर्णय घेते तेव्हा तिच्या समोर म्हणजेच व्यवस्थापक व व्यवस्थापन मंडळासमोर कोणत्या वस्तुंचे, किती प्रमाणात, कोठे उत्पादन करायचे, कोणत्या पध्दतीने उत्पादन करायचे, मर्यादित आणि दुर्मिळ साधन सामुग्रीचे योग्य वितरण करून जास्तीत जास्त उत्पादन, जास्तीत जास्त विक्री, जास्तीत जास्त नफा कसा मिळवायचा असे अनेक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अर्थशास्त्रीय सिध्दान्तांचा व्यवहारात वापर कसा करून घ्यायचा, निर्णय कसे घ्यायचे याचे विश्लेषण व्यावसायिक अर्थशास्त्र करते. बरेचसे अर्थशास्त्रीय सिध्दान्त गृहित परिस्थितीवर आधारीत असतात. त्यामुळे ते अव्यवहार्य ठरतात. त्यांना व्यवहार्य करण्याचे कार्य व्यावसायिक अर्थशास्त्र करते. व्यावसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप सुक्ष्मलक्षी अध्ययनाचे आहे. यात एका उद्योग संस्थेच्या व्यवहार्य वर्तणूकीचा सुक्ष्म अभ्यास केला जातो. म्हणून याला 'उद्योग संस्थेचा सिध्दान्त' असेही म्हणतात एक उद्योग संस्था आपले ध्येय (Goal) कसे निश्चित करते आणि ते गाढण्यासाठी कसे प्रयत्न करते, उत्पादन, विक्री, नफा आणि वृध्दीचे महत्तमीकरण कसे करते, उपभोक्त्यांच्या मागणीचा अंदाज कसा करते, किंमत विषयक धोरण कसे ठरविते, बाजारातील स्पर्धक वा मक्तेदारी, सरकारचे धोरण या विषयी कसे निर्णय घेते. इत्यादी बाबत सैध्दान्तिक अर्थशास्त्राचा व्यवहारात उपयोग करून घेण्याचे कार्य व्यावसायिक अर्थशास्त्र करते. व्यावसायिक अर्थशास्त्र सुक्ष्मलक्षी बरोबरच समग्रलक्षी अर्थशास्त्राचा ही व्यवहारात वापर करून घेते. उद्योग संस्थेला जर व्यापार चक्र, स्पर्धक धोरण, सरकारचे किंमत विषयक धोरण, सरकारचे विदेश व्यापार विषयक धोरण, मक्तेदारी नियंत्रणात्मक कायदे, कामगार कायदे, इत्यादीबाबत पुरेशी माहिती असेल तर ती योग्य निर्णय घेऊन नफ्याचे महत्तमीकरण करण्यात यशस्वी ठरू शकते. व्यावसायिक अर्थशास्त्र वर्तमान काळाबरोबरच भविष्यकालीन नियोजन आखण्यास उद्योग संस्थेला मार्गदर्शन करते.

भविष्यात कोणत्या वस्तुला मागणी असेल, किती असेल याबाबत मागणीचे पुर्व अंदाज अचुक अंदाज घेऊन उद्योग संस्था भविष्यकालीन नियोजन तयार करतात. या कार्यात अर्थशास्त्रीय सिध्दान्त, अर्थशास्त्रज्ञ, नियोजनकार मदत करीत असतात. व्यावसायिक अर्थशास्त्र उद्योग संस्थेच्या वर्तणुकीचे वर्णन करण्याबरोबर निश्चित केलेले ध्येय गाठण्यासाठी ती कशी प्रयत्न करते याचे आदर्शवादी विश्लेषण करते. व्यावसायिक अर्थशास्त्र आर्थिक विचारांबरोबरच सामाजिक , सांस्कृतिक, राजकीय घटकांचा उद्योग संस्थेवर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करते. सैध्दान्तिक अर्थशास्त्र नफ्याचे महत्तमीकरण या एकाच ध्येयांवर लक्ष केंद्रीत करते. परंतु व्यावसायिक अर्थशास्त्र नफ्याच्या महमत्तीकरणा बरोबरच विक्री महत्तमीकरण, वृध्दी महत्तमीकरण, उद्योग नेतृत्व, कामगार कल्याण, प्रदुषण नियंत्रण या सारख्या नवीन ध्येयांवरही लक्ष केंद्रीत करते.

थोडक्यात व्यावसायिक अर्थशास्त्र व्यवस्थापकीय निर्णय घेणे आणि भविष्यकालीन नियोजन आखण्यासाठी अर्थशास्त्रीय सिध्दान्तांचा व्यवहार्य वापर करून घेणारे शास्त्र आहे.

**ब) व्यावसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप**

(Nature of Business Economics)

व्यावसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**1) सुक्ष्मलक्षी आर्थिक स्वरूप –** व्यावसायिक अर्थशास्त्राच्या अध्ययनाचे स्वरूप सुक्ष्मलक्षी असते. यात एखाद्या वस्तुचे उत्पादन करणाऱ्या उद्योगातील सर्व उद्योगसंस्थांचे अध्ययन न करता उद्योगातील एखाद्या उद्योग संस्थेचा उत्पादन विषयक निर्णय, घटक मोबदला विभाजनाचा निर्णय, वस्तु किंमत निश्चितीचा निर्णय, मागणी व मागणीचा पुर्व अंदाज, उद्योग संस्थेचे ध्येय, ते गाठण्यासाठी केलेले नियोजन इत्यादी व्यवस्थापकीय निर्णयाशी संबधित बाबीचा सुक्ष्म पातळीवर अभ्यास केला जातो.

**2) समग्रलक्षी अर्थशास्त्राची मदत –** व्यावसायिक अर्थशास्त्राच्या अध्ययनाचे स्वरूप जरी सुक्ष्मलक्षी असले तरी ती उद्योग संस्था जे निर्णय घेते आणि भविष्यकालीन नियोजन करते त्यावर तेजी–मंदीची व्यापार चक्रे, सरकारचे किंमत विषयक, चलन विषयक, वित्तीय विषयक, विदेश व्यापार विषयक, विदेश चलन विनिमय विषयक, कामगार विषयक, मक्तेदारी नियंत्रण विषयक इत्यादी धोरणाचा परिणाम होत असतो. सरकारच्या या सर्व धोरणांची जी उद्योग संस्था माहिती ठेवून निर्णय आणि नियोजन करते तीच उद्योगात टिकून राहते आणि विकास करते. व्यावसायिक अर्थशास्त्र समग्र लक्षी अर्थशास्त्राची मदत घेऊन व्यवस्थापकाला योग्य

ते मार्गदर्शन करते.

**3) विज्ञान आणि कला स्वरूप –** ज्ञानाचा क्रमबध्द समुच्चय म्हणजे विज्ञान होय. यात तत्थ्य किंवा एखाद्या समस्येविषयी माहितीचे संकलन केले जाते. संकलित माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण केले जाते. तत्थ्याचे कारण आणि परिणामांचा संबंध पडताळून पाहिला जातो आणि त्या आधारे निष्कर्ष काढून सिध्दान्ताची मांडणी केली जाते. विज्ञानात मांडलेले नियम प्रयोग सिध्द असतात. त्यांची उलट तपासणी करता येते आणि ते त्रिकालाबाधित सत्य असतात. या अर्थाने विचार केल्यास व्यावसायिक अर्थशास्त्र एक विज्ञान ठरते. यातील सम सीमांत उपयोगितेचा नियम, मागणीचा नियम, घटत्या उत्पादन फलाचा नियम विज्ञानातील नियमाप्रमाणे खरे ठरणारे आहेत. विज्ञानातील ज्ञानाचा व्यवहारात वापर करून मानवी कल्याण वृध्दींगत करणे ही एक कला आहे. या अर्थाने विचार केल्यास व्यावसायिक अर्थशास्त्र विज्ञानाबरोबरच एक उत्कृष्ट कला आहे. सैध्दान्तिक अर्थशास्त्रात सांगितले जाते की किंमत कमी केल्यास मागणीत वाढ घडून येते. एखाद्या उद्योग संस्थेने आपल्या मागणीत वाढ करण्यासाठी खरच किंमत कमी केली तर निश्चितच तिच्या मागणीत वाढ होते. व्यावसायिक अर्थशास्त्र हा कला आणि विज्ञान या दोहोंचा सुरेख संगम आहे.

**4) वास्तववादी आणि आदर्शवादी दृष्टीकोन –** एखाद्या समस्येचे आहे तसे स्पष्टीकरण किंवा विश्लेषण करणारे विज्ञान वास्तववादी (Positive) मानले जाते. व्यावसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप वास्तव वादापेक्षा आदर्शवादी (Normative) जास्त आहे. वास्तववादी वस्तुस्थितीचे जसेच्या तसे वर्णन करते ते चांगले आहे की वाईट आहे हे सांगत नाही. काय करावे काय करू नये हे सांगत नाही. त्यामुळे विज्ञाना ची उपयुक्तता कमी होते. व्यावसायिक अर्थशास्त्र समस्यांची सोडवणुक करण्याचा चांगला मार्ग कोणता आहे, काय योग्य काय अयोग्य असे आदर्शवादी विश्लेषण करते. किंमत वाढ किंवा घट उद्योग संस्थेसाठी चांगली की वाईट याचे आदर्श विश्लेषण व्यावसायिक अर्थशास्त्र करते. उत्पादन खर्चाची बचत करण्यासाठी उद्योग संस्थेचे आकारमान लहान असावे की मोठे असावे, उत्पादन प्रमाण मोठे असेल तर त्यातून अंतर्गत आणि बाह्य बचती व अबचती कशा निर्माण होतील याचे विश्लेषण व्यावसायिक अर्थशास्त्र करते.

**5) व्यावहारीक स्वरूप –** अर्थशास्त्रातील जे सिध्दान्त अव्यवहार्य असतील, भ्रामक असतील त्यांना टाळून उद्योग संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत आणि भविष्यकालीन योजना तयार करण्यासाठी जे सिध्दान्त उपयुक्त ठरतील त्यांना व्यावहारीक रूप प्रदान करण्याचे कार्य व्यावसायिक अर्थशास्त्र करते. व्यावसायिक

अर्थशास्त्राच्या अध्ययनाचे स्वरूप सिध्दान्त आणि त्यांची व्यावहारीक उपयुक्तता यातील अंतर कमी करण्याचे असते.

**6) निर्णय घेणे आणि भविष्यकालीन योजना आखणे –** व्यावसायिक अर्थशास्त्राचे स्वरूप निर्णय घेण्याची प्रक्रिया आणि भविष्यकालीन योजनेची आखणी यांच्याशीही संबधित असते. मुळात उद्योग संस्थेकडे उत्पादक साधन सामग्री मर्यादित असते. ती मर्यादित असली तरी तिच्या पर्यायी वापराची शक्यता असते. अशी मर्यादित व पर्यायी वापराची शक्यता असलेली साधन सामग्री कोणत्या वस्तू उत्पादनासाठी खर्च करावी याचा निर्णय उद्योग संस्थेला घ्यावा लागतो. शिवाय उद्योग संस्था जो निर्णय घेते त्यात अनिश्चितता असते. म्हणून अनिश्चिततेच्या परिस्थितीत निश्चित केलेले ध्येय गाठण्यासाठी साधन सामग्रीच्या पर्याप्त वापराचा निर्णय घ्यावा लागतो. उद्योग संस्था नफ्याचे महत्तमीकरण, विक्री महत्तमीकरण, वृध्दी महत्तमीकरण, उद्योगाचे नेतृत्व करणे यासारखे अनेक ध्येय () अगोदर निश्चित करते आणि ते साध्य करण्यासाठी भुमी, श्रम, भांडवल, कच्चा माल, उत्पादन, किंमत निश्चिती इत्यादी बाबत भविष्यकालीन नियोजन तयार करते. नियोजन करण्यासाठी भुतकालीन माहिती, वर्तमानकालीन परिस्थितीची माहिती आणि भविष्यकाळाचे पुर्व अंदाज इत्यादीचा आधार घेते.

**क) व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याप्ती**

(Scope of Business Economics)

सैध्दान्तिक अर्थशास्त्राची व्याप्ती विस्तृत आहे. व्यावसायिक अर्थशास्त्राची व्याप्ती व्यवस्थापकीय निर्णय आणि भविष्यकालीन नियोजनापुरती मर्यादित आहे. व्यावसायिक अर्थशास्त्रात पुढील बाबींचा अभ्यास केला जातो.

**1) उद्योग संस्थेचा उद्देश –** व्यावसायिक अर्थशास्त्राच्या अध्ययनाच्या कक्षा उद्योग संस्थेच्या व्यावहारीक वर्तणुकीपुरत्याच मर्यादित असतात. म्हणून व्यावसायिक अर्थशास्त्र उद्योग संस्थेचा उद्देश आणि त्याच्या पुर्ततेसाठी केले जाणाऱ्या प्रयत्नांचा अभ्यास करते.

**2) मागणीचे विश्लेषण आणि मागणीचा पुर्व अंदाज –** वस्तुची वर्तमान कालीन मागणी आणि भविष्यकालीन मागणी याची माहिती व्यावसायिक अर्थशास्त्राच्या अर्थशास्त्रज्ञांना असावी लागते. वर्तमानकाळात वस्तुला किती मागणी आहे आणि भविष्यात किती मागणी राहील याची माहिती असेल तर वस्तुची निवड करणे आणि उत्पादन पातळी निश्चित करणे याबाबत नियोजन करणे शक्य होते. यात मागणी ठरविणारे घटक, मागणीचा नियम, मागणीची लवचिकता आणि मागणीचा पुर्व अंदाज करण्याच्या पध्दतींचा अभ्यास केला जातो.

# [illegible]
# ([illegible]-1)





Publisher : Prashant Publications

ISBN : 9788193989784

Author : [illegible]


Type the URL :https://www.kopykitab.com/product/52384

Get this eBook